www.rajdand.com
सातारा, गुरुवार
09.02.2023
पृष्ठ : ४ । मूल्य : ₹ ४.०० । माघ कृ.४
/rajdandlive
Reg.No. MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे

'गावसकर बॉर्डर चषक' भारत जिंकेल



पान ४ वर..

# ईडीचं आभार माना, त्यामुळेच सगळे विरोधक माझ्याविरोधात एकाच मंचावर; नरेंद्र मोदींचा हल्लाबोल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**काही लोकांना फक्त निवडणुका आल्या की जनतेची आठवण येते, पण दहा वर्षाच्या काळात देशाचं सामर्थ्य आणि स्वातंत्र्य दाखवण्याची त्यांनाही संधी होती, पण ते न करता मोदींना शिव्या देऊन काहींना मार्ग निघेल असं वाटतंय अशी घणाघाती टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर केली. विरोधकांनी ईडीचे आभार मानावं, ईडीमुळेच ते एका मंचावर आले असा टोलाही त्यांनी लगावला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभाराच्या भाषणावर ते बोलत होते.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणातून काँग्रेसवर टीका केली. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी त्यांच्या भाषणात नरेंद्र मोदी आणि उद्योगपती गौतम अदानींवर टीका केली होती, त्याला नरेंद्र मोदी यांनी उत्तर दिलं. नरेंद्र मोदी म्हणाले की, हा देश काँग्रेसच्या विचारांच्या बाहेर आहे, काँग्रेसला हा देश कधी समजलाच नाही. विरोधकांनी केलेल्या आरोपांना कोट्यवधी लोकांचं आव्हान पार करावं लागेल, या लोकांना अनेक दशकं वाईट अवस्थेत जीवन जगायला त्यांनी भाग पाडलं. देशातील १४३ कोटी नागरिक हे माझं शस्त्रकवच आहेत, खोटे आरोप करुन तुम्ही कधीच याला भेदू शकत नाही.

अहंकार असलेले लोक मोदींवर आरोप करतात असं सांगत नरेंद्र मोदी यांनी आपल्याला शिव्या देऊन कोणत्याही गोष्टीतून मार्ग निघणार नाही अशी टीकाही केली. आमचं सरकार समाजातील वंचित घटकांचा विकास करण्यासाठी झटत आहे. अनेक दशकं दलितांना आणि आदिवासींना विकासापासून वंचित ठेवण्यात आलं होतं, त्यांचं आम्ही कल्याण करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

ज्या शेतकऱ्याच्या खात्यावर पीएम किसान सन्मान निधी जमा होतोय तो विरोधकांच्या खोट्या आरोपांवर विश्वास नाही ठेवणार. तीन कोटींहून अधिक लोकांना पक्की घरं दिली, ते विरोधकांवर विश्वास ठेवणार नाहीत. देशातील ११ कोटी महिलांना इज्जत घर, शौचालय मिळालं, ९ कोटी महिलांना मोफत एलपीजी देण्यात आले, ८ कोटी परिवाराला नळाचं पाणी मिळालं. हे सर्व लोक विरोधकांच्या आरोपांवर विश्वास ठेवणार नाहीत.

नरेंद्र मोदी म्हणाले की, ''भारतात दोन तीन दशकं अस्थिरता होती. आता स्थिर सरकारही आहे आणि निर्णयही होतात. त्यामुळे त्याचं रुपांतर विश्वासात होतंय. एक निर्णायक सरकार, पूर्ण बहुमताने चालणारं सरकार राष्ट्रहिताचे निर्णय घेण्यात कसूर ठेवत नाहीत. कालानुरुप देशाला जे हवं, तसे निर्णय आम्ही घेत जाऊ. कोरोनाकाळात भारताने जगाला लसीचा पुरवठा केला. कोट्यवधी जनतेला मोफत लस दिली. १२५ देशांना जिथे औषधं हवी होती, तिथे औषधं, जिथे अन्य मदत ती केली. त्यामुळेच आज भारताचा जगभरात गौरव होत आहे.''

# लावणीच्या नावाखाली अश्लील प्रकार नको

## अजित पवार यांचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

लावणीच्या नावाखाली अश्लील प्रकार करणे अशोभनीय असून ते थांबलेच पाहिजेत, असा इशारा माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला. वेळप्रसंगी हा विषय विधिमंडळ अधिवेशनात उपस्थित करू, असा इशाराही त्यांनी दिला.



महाराष्ट्राला लावणीची मोठी परंपरा आहे. ती टिकवून ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. त्याला विकृत वळण लाऊन लावणीच्या नावाखाली अश्लील नृत्य करून त्याला गालबोट लागता कामा नये, असे पवार यांनी सांगितले.

काही जिल्ह्यांमध्ये अशा गैरप्रकारांना बंदी घालण्यात आली आहे. काही जिल्ह्यात ते सर्रास सुरू आहेत. आपण त्याबद्दल संबंधितांकडून माहिती घेऊन त्याला आळा घालण्यासाठी प्रयत्न करू. प्रसंगी अधिवेशनात हा विषय मांडू, असेही पवार म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या, कार्यकर्त्यांकडून अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जात असेल तर त्यांना तंबी देण्यात येईल, असेही ते म्हणाले.

# शिंदे गटाला शिवसेना मानत नाही : उद्धव ठाकरे

■ निवडणूक आयोगाकडे केली न्यायाची मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना एकच आहे आणि एकच राहील. शिंदे गटाला आपण शिवसेना मानतच नाही, असे सांगतानाच शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी निवडणूक आयोगाने लवकरात लवकर न्याय करावा, अशी मागणी केली आहे.



ठाकरे यांनी मातोश्री निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी शिंदे गटावर हल्ला चढवितानाच शिंदे गटातील १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत त्वरित निर्णय देण्याची मागणी केली.

शिंदे गटातील आमदार पळपुटे आहेत. स्वतः पक्ष सोडून गेले आहेत. अशा पळपुट्या लोकांना पक्षावर दावा सांगण्याचा कोणताही अधिकार नाही, असा दावा ठाकरे यांनी केला. आमदारांच्या जीवावर पक्षावर दावा करणे हास्यास्पद असल्याची टीका करून ते म्हणाले की, केवळ लोकप्रतिनिधी म्हणजे पक्ष नव्हे. तसे असते तर उद्योगपतीच पक्ष आणि राज्य चालविणारे झाले असते.

शिवसेनेला घटना आहे. आम्ही शिवसेनेच्या घटनेचे तंतोतत पालन करतो. शिंदे गटाला घटनाच नाही. शिवसेनेची घटना त्यांना मान्य नाही, असेही ठाकरे यांनी नमूद केले.

निवडणूक आयोगाने सांगितलेल्या सर्व बाबींची आम्ही पूर्तता केली आहे. पदाधिकाऱ्यांची प्रतिज्ञापत्र सादर केली आहेत. आता निवडणूक आयोगाने लवकर निर्णय घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. शिंदे गटातील १६ आमदार अपात्र ठरतील. शिवसेनेला कोणताही धोका असल्याचे दिसत नाही, असा दावाही त्यांनी केला.

# राजीव सातव यांच्या पत्नी आमदार प्रज्ञा सातव यांच्यावर अज्ञाताकडून हल्ला

**हिंगोली : वृत्तसंस्था**



काँग्रेसचे दिवंगत नेते राजीव सातव यांच्या पत्नी आणि आमदार प्रज्ञा सातव यांच्यावर अज्ञाताकडून हल्ला झाल्याची घटना घडली आहे. त्यांच्या मतदारसंघातील कसबे दौंड या गावात असताना हा हल्ला झालेला आहे. प्रज्ञा सातव यांनी स्वतः सोशल मीडियाच्या माध्यमातून ही माहिती दिली आहे. या हल्ल्यामागचं नेमकं कारण काय हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

आमदार प्रज्ञा सातव या आज हिंगोली दौऱ्यावर होत्या. कसबे दौंड या गावांमध्ये त्यांच्यावर अज्ञात व्यक्तीने हल्ला केल्याची माहिती त्यांनी स्वतः दिली आहे. प्रज्ञा सातव या दिवंगत खासदार राजीव सातव यांच्या पत्नी असून त्या विधानपरिषद आमदार आहेत. दौऱ्यादरम्यान अशा पद्धतीने अचानक हल्ला कशामुळे झाला हे अद्याप स्पष्ट नाही.

# राज्यांना पेलविणार नाही जुन्या पेन्शन योजनेचा भार

## केंद्र सरकाचा राज्यांना इशारा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जुन्या. निवृत्तीवेतन योजनेमुळे भविष्यात राज्य सरकारांच्या तिजोऱ्यांवर भविष्यात मोठा ताण पडणार आहे. हा ताण राज्यांना न पेलविणारा असेल, असा इशारा केंद्र सरकारने राज्यांना दिला आहे.

सध्या निवृत्तीवेतन योजना हा मोठा वादाचा विषय बनला आहे. केंद्राने बचत करण्यासाठी नवी निवृत्तीवेतन योजना आणली आहे. मात्र, निवृत्तीवेतनधारकांना ती मान्य नाही. त्यामुळे हा राजकीय मुद्दा बनला आहे.

लोकसभेत बोलताना अर्थ राज्यमंत्री भागवत कराड यांनी याबाबत रिझर्व्ह बँकेच्या एका अहवालाचा दाखला दिला. राज्यांना दिल्या जाणाऱ्या निधीबाबत या अर्थसंकल्पातील



तरतुदींचे विश्लेषण करणारा हा अहवाल आहे. त्यामध्ये रिझर्व्ह बँकेनेही राज्यांना जुन्या निवृत्तीवेतन योजनेच्या मोहात न पडण्याचा सल्ला दिला आहे.

विरोधी पक्षांनी निवृत्तीवेतन योजनेचा मुद्दा राजकीय बनविला असून ते नव्या योजनेचा विरोध करीत आहेत. विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या पाच राज्यांनी नवी योजना नाकारून जुनी योजनाच सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. आगामी काळात होणाऱ्या निवडणुकांमध्ये हा प्रचाराचा मुद्दा असणार आहे. महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधान परिषद निवडणुकांमध्ये भाजपच्या पीछेहाटीचे एक कारण हाच मुद्दा ठरला आहे.

# अदानींच्या चौकशीवर चर्चा का झाली नाही?

## पंतप्रधान मोदींच्या लोकसभेतील भाषणावर राहुल गांधींची प्रतिक्रिया

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी काँग्रेसवर जोरदार टीका केली. या वेळी विरोधी पक्षांनी गोंधळ घातला आणि अदानी प्रकरणाची जेपीसी चौकशीची मागणी करत घोषणाबाजी केली. यानंतर आता पंतप्रधान मोदी यांच्या भाषणावर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. राहुल गांधी थेट आरोप करत म्हणाले आहेत की, पंतप्रधान त्यांना वाचवत आहेत.

राहुल गांधी म्हणाले आहेत की, ''पंतप्रधान नरेंद्र मोदी चौकशी बाबत का बोलले नाहीत? बेनामी संपत्तीवर चर्चा का झाली नाही? राहुल गांधी यांनी, मोठा घोटाळा झाल्याचा दावा केला आहे. माझ्या प्रश्नांची उत्तरेही मिळाली नाहीत. अदानी पंतप्रधान मोदींचे मित्र नसते तर चौकशी



झाली असती, असं ते म्हणाले आहेत. तत्पूर्वी, राहुल गांधी यांनी मंगळवारी (७ फेब्रुवारी) मोदी सरकारमध्ये अदानींचा व्यवसाय प्रचंड वाढला आणि भाजपला त्याचा वैयक्तिक फायदा झाला, असा दावा केला होता. दोघांच्या जवळीकतेमुळेच हे घडल्याचे राहुल गांधी म्हणाले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी लोकसभेतील राहुल गांधींच्या भाषणाकडे लक्ष वेधले आणि ते म्हणाले की, काही लोकांच्या भाषणानंतर समर्थक उड्या मारत होते. ते आनंदाने म्हणू लागले की, बरोबर बोललात! कदाचित त्यांना आज चांगली झोप लागली असेल, कदाचित आज त्यांना जागही आली नसेल. ते पुढे शायरीत म्हणाले की, ये कह-कह कर हम दिल को बहला रहे हैं, वो अब चल चुके हैं, वो अब आ रहे हैं.

राहुल गांधी यांनी संसदेत दावा केला होता की, अदानींसाठी विमानतळ नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. जर कोणी विमानतळ व्यवसायात नसेल तर ते विमानतळ कॉन्ट्रॅक्ट घेऊ शकत नाहीत, हा नियम भाजपच्या केंद्र सरकारने अदानींसाठी बदलला. तसेच २०१४ नंतर अदानींच्या संपत्तीत वाढ झाल्याचेही त्यांनी सांगितले.

# तातडीने ऊस दर नियंत्रण मंडळाची स्थापना करा; राजू शेट्टी यांची सहकारमंत्र्यांकडे मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

अजूनही मागील हंगामातील गाळप झालेल्या ऊसाचा हिशोब पूर्ण करून ऑडिट झालेलं नाही. हा हिशेब पूर्ण करून अंतिम दर निश्चित करण्यासाठी आर.एस.एफ सुत्रानुसार दर मंजूर करणेसाठी तातडीने ऊस दर नियंत्रण मंडळाची स्थापना करावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी केली आहे. सहकार मंत्री अतूल सावे यांना आज यासंदर्भात निवेदन देण्यात आले. राज्य सरकारने तातडीने ऊस दर नियंत्रण मंडळ गठीत करून राज्यातील गेल्या हंगामातील अंतिम दर निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# पं.उपेंद्र भट यांच्या बहारदार अभंगवाणीने दासनवमी गायन महोत्सवाला प्रारंभ



**सज्जनगड येथील समर्थ सेवा मंडळ आयोजित दासनवमी संगीत महोत्सवात गायन सादर करताना पं.उपेंद्र भट. (छाया : अतुल देशपांडे, सातारा)**

**सातारा : प्रतिनिधी**

जगप्रसिद्ध पहाडी आवाजाचे गायक स्वरभास्कर स्वर्गीय पंडित भीमसेन जोशी यांचे पट्ट शिष्य पं. उपेंद्र भट यांनी सज्जनगडावर रंगवलेल्या रागदारी आणि अभंग वाणीने सज्जनगडच्या दास नवमी उत्सवाला प्रारंभ झाला .

सज्जनगड येथील श्री समर्थ सेवा मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या यावर्षीच्या दास नवमी महोत्सवांतर्गत गायन सेवेचा प्रारंभ पं. उपेंद्र भट यांनी यमन कल्याण रागातील गुरु शिष्यांचे वर्णन असणाऱ्या ..अवगुन न किजिये गुनिजन की..या सुरेख बंदिशीने केली ..सतगुणके गुणी गुन निधन गुरु संग राखो इमान.. या द्रुतलयीतील बंदिशीनंतर आपल्या संत परंपरेत असलेल्या अनेक संतांनी आपल्यावर मोठे उपकार केले आहेत. जय जय राम कृष्ण हरी ..हा केव्हाही जपता येणारा मंत्र आपल्याला दिला. या मंत्रात फार मोठी ताकद आहे आणि या नावातील राम हा रामायण सांगतो ,कृष्ण हा महाभारत सांगतो ,आणि हरि हा भागवत सांगतो असे सांगताना पंडित उपेंद्र भट यांनी या नाममंत्राची महती सांगताना काय करायचे ते रामायणात ,काय करू नये ते महाभारतात आणि २४ तास जे करायचे ते भागवतात वर्णन असलेल्या या अतिशय सुरेख अभंगाला सादर करून कलावती रागातील ..आरंभी वंदीन अयोध्येचा राजा.. अतिशय सुरेखपणे सादर केले.

आनंद घन राम नाम.. हा नामाची महती सांगणारा आणखीन एक अभंग सादर करून पंडित भीमसेन जोशी यांना आवडणारा ..ज्याचा सखा हरी ..हा अभंग उंचीच्या आणि पहाडी बहारदार आवाजातून सादर करताना उपस्थितांना अक्षरशः बोलायला लावले .

संत रामदास स्वामी महाराजांचा.. कैवारी हनुमान आमचा ..हा रामभक्त हनुमानाचा अभंग सादर करून पुरंदरदास संतांनी रचलेले कर्नाटक भागातील सुप्रसिद्ध ..सौभाग्यदा लक्ष्मी बारम्मा ..हे कानडी भजन सादर करून , लतादीदींनी सुप्रसिद्ध केलेल्या ..ठुमक चलत रामचंद्र.. या हिंदी भजनाला सादर करून.. घे रे घे, हरिनाम.. जपतो रामनाम ..ही भैरवी रंगवत चाललेल्या या दोन तासाच्या अभंगवाणीला पूर्णविराम दिला. उपेंद्र भट यांना या गायन कार्यक्रमात सहगायन साथ नागेश पांचाळ यांनी केली ,तर संवादिनी वर साथ अभिनय रवंदे आणि तबल्यावर साथ आनंद अभ्यंकर यांची होती. पखवाजावर गणेश चाकणकर आणि टाळाची साथ अतुल गरुड व सुरेश कुलकर्णी यांची होती या सर्व कलाकार मंडळींचा सत्कार समस्त सेवा मंडळाचे वतीने ज्येष्ठ मार्गदर्शक विलासराव ताम्हणकर यांच्या हस्ते शाल श्रीफळ व समर्थ प्रसाद देऊन करण्यात आला. या कार्यक्रमासाठी मंडळाचे जेष्ठ प्रवचनकार डॉ .अजित कुलकर्णी, गायन महोत्सवाचे संयोजक सुरेशराव साखवळकर, कार्यवाह योगेश बुवा रामदासी ,जेष्ठ समर्थ भक्त अरविंद बुवा रामदासी ,सौ.रसिकाताई ताम्हणकर व संपूर्ण देश विदेशातून महोत्सवाला आलेले शेकडो समर्थ भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समर्थ भक्त अजेयबुवा रामदासी यांनी केले.

८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सात वाजता या दासनवमी गायन महोत्सवात सौ. मंजिरी कर्वे आलेगावकर यांची गायन सेवा सादर होणार आहे.

# १ लाख पुणेकर अन् एकच सूर! पुणेकरांनी रचला सामूहिक अथर्वशीर्ष पठणाचा जागतिक विक्रम

**पुणे : प्रतिनिधी**

एक लाख पुणेकरांनी सामूहिक अथर्वशीर्ष पठणाचा जागतिक विक्रम केला. गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या भक्तीउत्सवात अथर्वशीर्ष पठण केलं. योग, साधना आणि सत्संग या त्रिसूत्रीच्या माध्यमातून जगभरातील लाखो नागरिकांचे आयुष्य बदलणाऱ्या श्री श्री रविशंकर यांचे मार्गदर्शन ऐकण्याची संधी यावेळी पुणेकरांना मिळाली. सामुहिक अथर्वशीर्ष पठणाच्या जागतिक विक्रमाची नोंद एशिया बुक ऑफ रेकॉर्डस्, इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस्, वर्ल्ड बुक ऑफ





रेकॉर्डस् लंडन येथे झाली असून जागतिक विक्रमाचे ई प्रमाणपत्र सर्व सहभागींना देण्यात येणार आहे.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. अथर्वशीर्ष हे वैज्ञानिक आहे. सर्वम खलविदं ब्रह्म असे आपण म्हणतो त्यावेळी गणेशाची शक्ती आणि आपली भक्ती आपल्यासमोर येते, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

यावेळी पुणेकरांनी प्रचंड प्रमाणात गर्दी केली होती. श्री श्री रविशंकर यांनी सगळ्या पुणेकरांचे आभार मानले.

# पुण्याची सात फेटेवाला साताऱ्याची चॅटिंग एकांकिका ठरल्या अव्वल

## नटखट राज्य बालिका स्पर्धेला राज्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा पालिका आणि कल्याणी ग्रुप यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय नटखट बालकांच्या स्पर्धेत पुण्यातील क ख ग संस्थेच्या सात फेटेवाला या बाल एकांकिकेने प्रथम क्रमांक मिळवला साताऱ्यातील रसिक कला मंचच्या चॅटिंग ने द्वितीय तसेच कोल्हापूरच्या अलंकार कलाकादमीने तृतीय क्रमांक पटकावला या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये मुंबई पनवेल रत्नागिरी पुणे इचलकरंजी कोल्हापूर सातारा येथील संघ सहभागी झाले होते.



लहान मुलांना त्यांची कला सादर करण्यासाठी तसेच नाट्य चळवळीतील पुढील पिढी तयार व्हावी हा उद्देश समोर ठेवून या नटखट एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते .नाविन्य वैविध्य अशा विषयांना हात घालून सर्वच संघांनी आपल्या सादर केलेल्या एकांकिकेतील सहभागी झालेल्या लहान कलावंतांनी आपली भूमिका अत्यंत ताकतीने आणि सहजपणे व ठवत या स्पर्धेत रंगत आणली . सर्वच संघातील कलाकारांनी सातारकर रसिकांची मने जिंकून घेतली स्पर्धेचे उद्घाटन सातारा पालिकेचे अतिरिक्त मुख्याधिकारी पराग कोडगुले सामाजिक कार्यकर्ते वसंत जोशी, हेरंब जोशी, क्रीडा संकटात इर्शाद बागवान यांच्या उपस्थितीत करण्यात आले . पारितोषिक वितरण समारंभास उद्योजक दत्ताजी थोरात सातारा कारागृहाचे व्यवस्थापक शामकांत शेडगे माजी नगरसेवक सागर पावशे राजेश मोरे संयोजन कमिटीचे प्रमुख कल्याण राक्षे इत्यादी रंगकर्मी आणि उपस्थित होते स्पर्धा परीक्षा म्हणून वर्षा चौगुले चंद्रकांत कांबिरे यांनी काम पाहिले.

**निकाल पुढीलप्रमाणे : रंगभूषा आणि वेशभूषा** - प्रथम क्रमांक सात फेटेवाला, द्वितीय क्रमांक कला मंच पनवेलमी छत्रपती शिवाजी महाराज होणार. **पार्श्वसंगित** - प्रथम क्रमांक बाराखडी नाट्यमंडळी सातारा -या चिमण्यांनो परत फिरा, द्वितीय क्रमांक क ख ग पुणे सात फेटेवाला. **नेपथ्य** - प्रथम क्रमांक इचलकरंजी थेंब थेंब श्वास, द्वितीय क्रमांक क ख ग पुणे सात फेटेवाला. **प्रकाश योजना** - प्रथम क्रमांक - बाराखडी नाट्यमंडळी सातारा - या चिमण्यांनो परत फिरा रे. **सर्वोत्कृष्ट अभिनेत्री** - स्पृहा इनामदार रसिक कला मंच सातारा, द्वितीय क्रमांक शर्वरी धडवई बाराखडी नाट्यमंडळी सातारा, तृतीय क्रमांक अंतरा पाटील ट्री थिएटर अकादमी पुणे.

**उत्तेजनार्थ** - सांगवी यादव ज्ञानेश्वरी कुरकुरे गार्गी हंगेकर सांगवी दाते अनुष्का कदम रिरोमा रोडे शांभवी प्रभुणे ऋतुजा इंगळे तन्वी मगर संयोगिता चौधरी श्रीमयी सावंत तनिष्का साकत.

**सर्वोत्कृष्ट पुरुष** - प्रथम क्रमांक अर्णव कुलकर्णी क ख ग पुणे, द्वितीय क्रमांक कुणाल गौड इचलकरंजी, तृतीय क्रमांक रियांश माळी बालघट रंगभूमी पुणे. **उत्तेजनार्थ** - सोहम जाधव पृथ्वीराज धोत्रे आयुध माळवाडे, यशोधन गावडे, गौरव खराडे सिद्धार्थ नगरकर.

मान्यवरांच्या हस्ते सर्व संघांना सहभाग प्रमाणपत्र विजेत्यांना प्रमाणपत्र सन्मानचिन्ह सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. साताऱ्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर जेष्ठ नाट्यप्रेमी सहभागी संघ स्पर्धक नाट्यरसिक प्रेक्षक बहुसंख्येने उपस्थित होते.

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पुण्यात महाआक्रोश मोर्चा!

**म्हसवड : प्रतिनिधी**

राज्यातील शिक्षकेतर कर्मचारी आपल्या हक्काच्या मागण्यासाठी १३ फेब्रुवारी रोजी पुणे येथे आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढणार आहेत, या मोर्चासाठी राज्यभरातून शिक्षकेतर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित राहणार असून सातारा जिल्यातील सेवकांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिक्षकेतर महामंडळाचे राज्याचे सहकार्यवाहक शिवाजीराव खांडेकर यांनी केले आहे.

माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यावर प्रत्येक वेळी सरकारने अन्याय केला आहे. त्यांच्यावर कामाच्या महत्वाच्या जबाबदाऱ्य देऊन, काम करवून घेतले जाते मात्र त्यांच्यावर वेतनश्रेणी देताना अन्याय केला जातो,म्हणून विविध मागण्याकडे सरकारच लक्ष वेधण्यासाठी १३ फेब्रुवारी रोजी शनिवार वाडा ते आयुक्त कार्यालय असा महाआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.





यावेळी सरकारकडून शिक्षकेतर कर्मचारी भरती वरील बंदी उठवावी, जुनी पेन्शन योजना लागू करावी, सातव्या वेतन आयोगातील तरतुदी प्रमाणे १०, २०, ३० या योजनेचा लाभ कर्मचाऱ्यांना मिळावा, अनुकंपा नोकर भरती करावी,अर्जित रजेचा लाभ देऊन रजा साठविण्याची कमाल मर्यादा वाढवून द्यावी, तर शिक्षक मतदार संघात मतदान करण्याचा अधिकार मिळावा अशा विविध मागण्या या महाआक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य शिक्षकेत्तर महामंडळाचे अध्यक्ष अनिल माने व सहकार्य वाहक शिवाजी खांडेकर यांनी दिली आहे.

**माध्यमिक शाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कमी वेतन देऊन राबवून घेतले जाते, त्यांच्या वेतनश्रेणीत वर्षानुवर्षे त्रुटी राहिल्या आहेत, हा अन्याय यापुढे सहन केला जाणार नाही, सातव्या वेतन आयोगातील १०,२०,३०, या योजनेचा लाभपासून फक्त माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी वंचित आहे.म्हणून सरकारला जाग आणण्यासाठी हा मोर्चा असून सातारा जिल्ह्यातून हजारोच्या संख्येने या मोर्चासाठी हजर रहावे, असे आवाहन जिल्हा संघटनेचे पदाधिकारी अनिल माने, रमेश इंगवले, इम्रान मुल्ला, संजय पवार, संतोष पोळ यांनी केले आहे.**

# अकलूज येथे शालेय राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धा संपन्न; पुणे विभागचे वर्चस्व



**अकलूज : प्रतिनीधी**

क्रीडा व सेवा युवक संचालन महाराष्ट्राची पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय सोलापूर जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर व सोलापूर जिल्हा धनुर्विद्या संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने १७ वर्षाखालील राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या स्पर्धा २०२२-२०२३ अकलूज येथील विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल या ठिकाणी पार पडली या मध्ये राज्यातील ९ विभाग सहभागी झाले होते. स्पर्धेचे उदघाटन व बक्षीस वितरण स्वरुपाराणी मोहिते पाटील, जिल्हा संघटनेचे उपाध्यक्ष भारत शिंदे, क्रीडा अधिकारी नितीन तारळकर,जिल्हा सचिव हरिदास रणदिवे यांच्या हस्ते करण्यात आले.

**कंपाऊंड राऊंड प्रकारच्या स्पर्धा निकाल पुढीलप्रमाणे :** मुले ओव्हरऑल निकाल ओम सूर्यकांत कांबळे ,पुणे प्रथम क्रमांक अथर्व लक्ष्मण कांबळे कोल्हापूर द्वितीय कपिल दत्ता सातघरे मुंबई तृतीय टीम प्रथम -पुणे ,द्वितीय-कोल्हापूर, टीम तृतीय-मुबंई मुली ओव्हर ऑल निकाल आर्या अतुल प्रसाद पुणे प्रथम ऋतुजा परमेश्वर कसाळ पुणे द्वितीय अनुष्का रमेश मदने पुणे तृतीय - प्रथम -पुणे ,द्वितीय-औरंगाबाद, तृतीय-नागपूर

इंडीयन राऊंड प्रकारच्या स्पर्धा निकाल पुढील प्रमाणे : मुले ओव्हर ऑल निकाल आदित्य अनंता चव्हाण, पुणे प्रथम क्रमांक स्वराज राजेंद्र जंगम, कोल्हापूर द्वितीय क्रमांक, अनिकेत महेंद्र गावडे ,कोल्हापूर, तृतीय क्रमांक.

टिम कोल्हापूर- प्रथम क्रमांक, पुणे - द्वितीय क्रमांक , नाशिक- तृतीय क्रमांक मुली ओव्हर ऑल निकाल ऋतुजा विनायक पवार - नाशिक, प्रथम क्रमांक समृद्धी शिवप्रसाद पवार - पुणे ,द्वितीय क्रमांक संचिता शिवाजी नाईक - कोल्हापूर, तृतीय क्रमांक टिम पुणे - प्रथम क्रमांक, कोल्हापूर- द्वितीय क्रमांक, नागपूर- तृतीय क्रमांक रिकर्व्ह राऊंड प्रकारच्या स्पर्धा निकाल पुढील प्रमाणेमुले ओव्हर ऑल निकाल यश मनोज उगले - अमरावती , प्रथम क्रमांक सोहम शरद कणसे - पुणे , द्वितीय क्रमांक अथर्व हनुमंत कदम - पुणे , तृतीय क्रमांक टिम अमरावती - प्रथम क्रमांक ,पुणे - द्वितीय क्रमांक, कोल्हापूर- तृतीय क्रमांक मुली ओव्हर ऑल निकाल वैष्णवी बाबर पवार -पुणे, प्रथम क्रमांक सिद्धी सुरेश साळुंखे - पुणे , द्वितीय क्रमांक सायमा महेमुद शेख - पुणे ,तृतीय क्रमांक

टिम - प्रथम क्रमांक- पुणे , द्वितीय क्रमांक - कोल्हापूर तृतीय क्रमांक - नागपूर या वेळेस भारत शिंदे,हरिदास रणदिवे,डॉ.विश्वनाथ आवड ,धर्मराज दगडे,सुप्रिया किरनाळे, सोनल बुंदीले,क्रीडा अधिकारी तानाजी मोरे, सुप्रिया गाढवे,श्री. धारूरकर , भैरावनाथ नायकुडे, आदी मान्यवर उपस्थित होते.

**ग्रामीण भागातील मुलांमध्ये देखील गुणवत्ता सिद्ध करण्याची क्षमता असते त्यांना फक्त गुणवत्तापूर्ण योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षणाची गरज असते,हे लक्षात घेता त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरचे प्रशिक्षण उपलब्ध करून देऊ व सोलापूर जिल्ह्यातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील धनुर्विद्येचे खेळाडू घडवू**

**– धैर्यशील मोहिते–पाटील, अध्यक्ष, सोलापूर जिल्हा धनुर्विद्या संघटना**

# कॉलेज जीवनाचा युवकांनी मनसोक्तपणे आनंद घ्या : जयसिंह मोहिते पाटील

**अकलूज : प्रतिनिधी**

अकलूजच्या शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना,राष्ट्रीय कॅंडेट कोअर,जिमखाना विभाग आणि सांस्कृतिक विभागातील विद्यार्थी यांचा सन्मान सोहळा कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.



सन २०२२ ते २०२३ या वर्षभरात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविला त्या ७५ विदयार्थ्यांचा याप्रसंगी प्रमाणपत्र व ट्रॉफी देवुन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना जयसिंह मोहिते पाटील म्हणाले कि, प्रत्येक व्यक्तीकडे कोणती तरी कला असायला हवी ती आपणास जगण्याची उर्जा निर्माण करून देते.केवळ महाविद्यालय शिकत बसू नका तर कॉलेज जीवनात स्वतः चे छंद जोपासत आनंदी जगण्याचा प्रयत्न करा,कारण हे जीवन पुन्हा मिळत नाही. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच सर्वच क्षेत्रात पारंगत होण्यासाठी प्रयत्न करून स्वताचे व्यक्तीमत्व घडवावे असे अवाहनही त्यांनी यावेळी केले.आपल्या महाविद्यालयीन जीवनातले अनेक प्रसंग विद्यार्थ्यांना त्यांनी रंजक पध्दतीने सांगितले नवनवीन शिकत रहा,पारंपरीक शिक्षणाबरोबरच स्वत:ला घडवायला शिका, हजरजबाबीपणा अंगिकारा,पुस्तके वाचा,ग्रंथालयाची माहीती घ्या, विविध प्रकारचे खेळ खेळा जास्तीत जास्त ट्रेस फ्रि राहण्याचा प्रयत्न करा असेही अवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे यांनी शिक्षण प्रसारक मंडळाचे व महाविदयालय विकास समितीचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांचे आणि संचालिका कु.स्वरूपाराणी मोहिते पाटील यांचे मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने चौफेर यश मिळविले आहे याबाबतचा अहवाल आपल्या मनोगतामध्ये सादर केला.

कार्यक्रमासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक महाविद्यालय विकास समितीचे सदस्य राजाभाऊ लव्हाळे, मनोज रेळेकर, प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे, प्रा.हणमंत आवताडे उपस्थित होते. या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी सन्मान क्रिडा यादीचे वाचन प्रा.अरविंद वाघमोडे, सांस्कृतिक विभाग यादीचे वाचन डॉ.विश्वनाथ आवड, एन.सी.सी.विभाग यादीचे वाचन प्रा.नंदकुमार गायकवाड यांनी केले.

सुत्रसंचालन डॉ.दत्तात्रय बारबोले यांनी केले तर आभार प्रा.अनिल पराडे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सिनीयर व ज्युनियर विभागातील सर्व प्राध्यापक,प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी ऑफिस अधिक्षक युवराज मालुसरे व त्यांचे सर्व सहकारी यांनी प्रशिश्रम घेतले.

# पंचायत समितीच्या उपअभियंत्यास लाच घेताना रंगेहाथ पकडले

**भोर : प्रतिनिधी**

भोर तालुक्यात एक वर्षात लाचलुचपत विभागाची ३ बड्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली असतानाही लाच घेण्याचे प्रकार अद्यापही सुरू असल्याचे समोर आले आहे. सोमवार (दि ७) रोजी पंचायत समितीतील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या जयंत सोपानराव ताकवले उपअभियंता वर्ग १ (ता.भोर जि.पुणे) या अधिकाऱ्यास लाचलुचपत विभागाने कारवाई करून ७० हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडल्याची घटना घडली.

या घटनेमुळे लाच मागण्याचे प्रकार भोर तालुक्यात सुरूच असून शासकीय अधिकारी, कर्मचारी लाच मागण्यात निर्ढावलेले असल्याचे समोर येत आहे. जयंत ताकवले यांनी ग्रामीण पाणीपुरवठा योजनेचे खरेदीचे बिल मंजूर केल्याचा मोबदला म्हणून लोकसेवक जयंत ताकवले उपाभियंता यांनी ७० हजार रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार होती. तक्रारदार यांच्याकडे बिलाच्या दोन टक्के प्रमाणे ७० हजार रुपये लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारल्यानंतर त्यांना पंचायत समिती येथील कार्यालयात ताब्यात घेण्यात आले.

# वेळापूर येथे गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**अकलूज : प्रतिनिधी**

दरवर्षी प्रमाणे यंदाही वेळापूर येथे जवळेकर गुरजी यांच्या निवास्थानी गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, १३ रोजी गजानन महाराज प्रकट दिन साजरा होत आहे. त्यानिमित्त दिनांक ११ ते १३ फेब्रुवारी दरम्यान सकाळी आठ ते अकरा या कालावधीत गजानन विजय ग्रंथाचे पारायण आयोजित केले आहे.

ज्यांना पारायणामध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांनी शनिवारी सकाळी आठ वाजता आपले ग्रंथ घेऊन गजानन महाराज मंदिर जवळेकर गुरुजी यांच्या घरी हजर रहावे. ज्यांना ग्रंथ नाही त्यांना ग्रंथ उपलब्ध करण्यात येणार आहे. १२ रोजी दुपारी चार वाजता सांगोल्यातील भजनी मंडळाचा कार्यक्रम होणार आहे. १३ रोजी सकाळी आठ ते दहा पारायण व दहा ते बारा भजन व बारा वाजता गुलालाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर आरती व महाप्रसाद होणार आहे. तरी सर्व भाविकांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन मधुकर जवळेकर गुरूजी यांनी केले आहे.

# राजगुरुनगरमध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी ३५ नागरिकांनी केली नोंदणी

**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ राजगुरुनगर, प्रेरणा सोशल फाउंडेशन, लायन्स क्लब ऑफ पुणे कात्रज, एच. व्ही देसाई हॉस्पिटल महम्मद वाडी पुणे, समता फाऊंडेशन मुंबई , विघ्नहर्ता लॅब यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी, मोफत बी. पी व शुगर तपासणी, मोफत मोतीबिंदू तपासणी, गरजूंना मोफत चष्मे वाटप, मोफत औषधे वाटप व आरोग्य तपासणी असे भव्य आरोग्य शिबिर पार पडले. हे शिबिर राजगुरुनगर येथील पंचायत समिती समोर जि.प. शाळा एक नंबर येथे आयोजित करण्यात आले होते.



शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरात तालुक्यातील १५६ नागरिकांनी लाभ घेतला. मोतीबिंदु शस्त्रक्रियेसाठी ३५ नागरिकांनी नोंदणी केली. ५६ व्यक्तींनी बी.पी व शुगर तपासणीचा लाभ घेतला. तसेच मोफत कॅल्शियम औषधांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमप्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजकुमारजी केंद्रे यांच्या हस्ते मोफत नेत्र तपासणी कॅम्पचे उद्घाटन करण्यात आले, यावेळी हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या प्रतिमेची पूजन करून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले,व या नंतर सत्कार करण्यात आला, मोफत नेत्रात तपासणी या शिबिराचा जास्तीत जास्त गरजवंतांनी फायदा घ्यावा व इतरांनाही सांगावं , सोशल संस्थांच्या माध्यमातून असेच सेवा कार्य जनतेची मोठ्या प्रमाणात हो अशा सदिच्छा शुभेच्छा राजकुमारजी केंद्रे यांनी दिल्या,लायन्स क्लब ऑफ पुणे कात्रज चे संस्थापक व झोन चेअरपर्सन ला. विठ्ठलराव वरुडे पाटील, ला.विलास आवटे, लायन्स क्लब ऑफ राजगुरुनगर च्या अध्यक्षा अक्षता कान्हूरकर, सेक्रेटरी ला.डॉ. शितल पवार, ट्रेझरर ला. अर्चना बोरा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निमगाव मुख्याध्यापक जालिंदर दिघे व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजगुरुनगर शाळेचे मुख्याध्यापक पिंगळे सर यांनी विशेष सहकार्य केले. यावेळी मिनल आहेर, ला. अंबर वाळूंज, ला. नितीन दोंदेकर, ला, कुणाल रावळ, ला. इम्रान मोमीन, ला. मनिष बोरा आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन अक्षता कान्हुरकर यानी केले.

# भोरमध्ये महिला उपासिका शिबीर संपन्न

## माघ पौर्णिमाचे औचित्य साधत मेणबत्तीच्या प्रकाशने उजळली दिक्षाभूमी

**भोर : प्रतिनिधी**

भगवान बुद्धांनी दिलेला शांती व करुणेचा मार्ग समाजात पोहोचावा बौद्ध धम्माचा प्रचार प्रसार व्हावा यासाठी केंद्र, राज्य, पुणे जिल्हा पूर्व भारतीय बौद्ध महासभा यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय बौद्ध महासभा शाखा भोर तालुका यांच्या वतीने महिला उपासिका शिबिराचे आयोजन २८ जानेवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान दिक्षा भूमी स्मारक सभागृहात करण्यात आले होते. या शिबिरामध्ये सुमारे चाळीस महीला उपासिका सहभागी झाल्या होत्या.



या शिबिरासाठी भारतीय बौद्ध महासभा शाखा पुणे पूर्व चे अध्यक्ष रघुनाथ साळवे, उपाध्यक्ष अरुण सोनवणे, उपाध्यक्षा सुजाता ओव्हाळ, सरचिटणीस राजरत्न थोरात, पालकमंत्री राजश्री सरोदे, राजेंद्र बेडेकर यांच्या वतीने मार्गदर्शनासाठी दररोज वेगवेगळे केंद्रीय शिक्षक पाठविले व त्यांनी दहा दिवस वेगवे गळ्या विषयांवर उपासिकांना मार्गदर्शन करत भगवान बुध्दांचा धम्म हा विज्ञानवादी तत्वांना अनुसरून असल्याची माहिती दिली.

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा शाखा भोरचे अध्यक्ष रामचंद्र रणखांबे, सचिव रुपेश जाधव,उपाध्यक्ष शंकर भालेराव,संस्कार सचिव अविनाश गायकवाड, खंडू गायकवाड पोपटराव चव्हाण, महीला उपाध्यक्षा अनिता हांडे, महीला सचिव संध्या गायकवाड, रुपाली जाधव, अनिता शेलार, निलम जगताप, लता रणखांबे, करुणा रणखांबे, त्रिवेणी हुंबरे, भारती मोरे, छाया भोसले, शुभांगी रणखांबे यांनी कथक परिश्रम घेतले. तर उपस्थित महिलांना रोज अल्पोपहार स्वरूपात फळे, नाश्ता चे आयोजन उपस्थित महिलांनी केले.

शिबीर दरम्यान मिळालेल्या प्रेरणेतून विविध पौर्णिमेच्या दिवशीच भगवान बुध्दांच्या आयुष्यात अनेक घटना घडल्या त्याचे महत्त्व लक्षात घेऊन रविवार (दि.५) रोजी माघ पौर्णिमाचे औचित्य साधत संध्याकाळी जमलेल्या शिबीरार्थी उपासिकांनी मेणबत्त्या लावल्याने दिक्षाभूमी स्मारक परीसर प्रकाशाने उजळून गेला होता.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दोन दिवसांच्या कोल्हापूर दौऱ्यावर

**कोल्हापूर :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह १९ फेब्रुवारीला दोन दिवसांच्या कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम होणार आहेत. त्यामुळे तीन आठवड्यांमध्ये तिसऱ्या केंद्रीय मंत्र्यांचा कोल्हापूर दौरा होत आहे. यापूर्वी जानेवारीचा पहिला पंधरवडा उलटल्यानंतर ज्योतिरादित्य शिंदे आणि नितीन गडकरी कोल्हापूर दौऱ्यावर होते. दरम्यान, अमित शाह यांच्या कोल्हापूर दौऱ्यासाठी भाजपकडून जय्यत तयारी करण्यात येत आहे. न्यू एज्युकेशन सोसायटीच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमाला अमित शाह उपस्थित राहतील. तसेच करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिर भेट, शिवाजी चौकातील शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करणार आहेत.

# शास्ती ९० टक्क्यांपर्यंत कमी करण्यासाठी थकबाकीची रक्कम ११ फेब्रुवारीपर्यंत संपूर्ण भरा

## अकलूज नगर परिषदेचे आवाहन

**अकलूज : प्रतिनिधी**

अकलूज नगर परिषदेची दिनांक ३ ऑगस्ट २०२१ रोजी स्थापना झालेली असून, महाराष्ट्र औद्योगिक नगरपरिषद,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ कलम १५० अ नुसार मालमत्ताकराची थकीत रक्कम आहे, तसेच थकित गाळा भाडेपोटी येणारे जी रक्कम आहे त्यावर प्रतिमाह २% टक्के शास्ती आकारली जाते. अशा पद्धतीने मालमत्ता कराचे बिलावर सुमारे ३६ टक्के पर्यंत शास्ती आकारण्यात येत आहे. परंतु अकलूज ही नवनिर्मित नगर परिषद असल्याने परंतु सद्य:स्थितीत स्थित्यंतराचा कालावधी सुरू असून बरेच नागरिकांना नगरपरिषदेचे नियम माहीत नसल्याने त्यांच्याकडून थकबाकीवरील शास्ती माफीची मागणी होत आहे.

सदरील बाब विचारात घेता नवनिर्मित नगरपरिषद असल्याने एक विशेष बाब म्हणून सदरील थकबाकीचे प्रकरण दिनांक ११ फेब्रुवारी २०२३ रोजी च्या लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आलेले आहे. सदर दिवशी सन्माननीय न्यायाधीश यांना शास्ती कर ८० ते ९० टक्के पर्यंत कमी करण्याबाबत विनंती केली जाणार आहे व न्यायालयाने नगरपरिषदेची विनंती मान्य केल्यास तसेच सदरील थकबाकीधारकांनी संपूर्ण रक्कम त्या दिवशी भरल्यास सदरील थकबाकीदारांची शास्ती ९० टक्के पर्यंत कमी केली जाणार आहे. तरी सर्व नागरिकांनी नगरपरिषदेच्या वतीने आवाहन करण्यात येते की, नवनिर्मित नगरपरिषदेचे प्रथम वर्ष असल्याने एकमेव संधी उपलब्ध झालेली असून, नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा व सदरील त्यांचे थकबाकीचे रक्कम दिनांक ११ फेब्रुवारी २०२३ पर्यंत एकाच टप्प्यामध्ये संपूर्ण भरावी व नगर परिषदेस सहकार्य करावे.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा.लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११/२ आणि १/१३, वारजे पुणे-४११ ०५८ येथे मुद्रित करून अर्थभवन, पोवई नाका, सातारा येथून प्रकाशित केले. या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद सातारा न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. सीईओ आणि मॅनेजिंग एडिटर राजेश वरळेकर. RNI Regd No. : MAHMAR/17902/1999

# ल्हासुर्णे आणि कोरेगाव दोन्ही आता येणार अधिक जवळ; आमदार महेश शिंदे यांच्या प्रयत्नांना यश

## वांगणा नदीवर पूल बांधण्यासाठी तब्बल साडेतीन कोटी रुपयांची तरतूद, शेतकऱ्यांची होणार गैरसोय दूर

**कोरेगाव : प्रतिनिधी**

कोरेगाव विधानसभा मतदारसंघातील गावे आणि वाडीवस्त्या रस्ते मार्गाने जोडण्याचा धडाका आमदार महेश शिंदे यांनी लावला आहे. कोरेगाव शहरासह ल्हासुर्णे पंचक्रोशीतील शेतकर्यांच्यादृष्टीने अत्यंत महत्वाच्या अशा कोरेगाव ते ल्हासुर्णे गावाला जोडणार्या साकव पुलाला नाबार्ड म्हणून मान्यता देण्यात आली आहे. आमदार महेश शिंदे यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले असून, मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी तब्बल साडेतीन कोटी रुपये मंजूर केले आहेत. या पुलामुळे शेतकर्यांची गैरसोय दूर होणार असून, ल्हासुर्णे पंचक्रोशी कोरेगावला जवळच्या मार्गाने जोडली जाणार आहे.



इतर जिल्हा मार्ग क्र. ७९ हा जांब बुद्रुक-ल्हासुर्णे-कोरेगाव-कुमठे-सांगवी-चिमणगाव-भंडारमाची असा असून, तो कोरेगाव आणि खटाव तालुक्यांना जोडणारा व सातारा-लातूर राष्ट्रीय महामार्गाला पर्यायी मार्ग म्हणून तो नजिकच्या काळात ओळखला जाणार आहे. भंडारमाचीतून वर्धनगडला खिंड रस्त्याने जोडले जाणार असून, हा रस्ता भविष्यकाळात विकासाचे प्रवेशद्वार ठरणार आहे.

वांगणा नदीवर कोरेगाव शहराच्या स्मशानभूमीनजिक पूल उभारण्याची गरज होती, त्यादृष्टीने दोन्ही गावच्या शेतकर्यांनी आमदार महेश शिंदे यांची भेट घेऊन निधीची तरतूद करण्याची मागणी केली होती. आमदार महेश शिंदे यांनी मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पुलाच्या कामासाठी निधीची तरतूद करण्यासाठी पत्र दिले होते. जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शंभूराज देसाई यांनी देखील या पुलाचे काम जलदगतीने व्हावे, यासाठी प्रयत्न केले होते. त्यानुसार महायुती सरकारने नाबार्ड म्हणून साडेतीन कोटी रुपये पुलाच्या कामासाठी मंजूर केले आहेत.

### हा रस्ता विकासाचे प्रवेशद्वार

**जांब बुद्रुक येथून सुरु असलेला इतर जिल्हा मार्ग क्र. ७९ हा ल्हासुर्णे–कोरेगाव–कुमठे–सांगवी–चिमणगाव–भंडारमाची असा असून, तो कोरेगाव आणि खटाव तालुक्यांना जोडणारा व सातारा–लातूर राष्ट्रीय महामार्गाला पर्यायी मार्ग म्हणून तो नजिकच्या काळात ओळखला जाणार आहे. भंडारमाचीतून वर्धनगडला खिंड रस्त्याने जोडले जाणार असून, हा रस्ता भविष्यकाळात विकासाचे प्रवेशद्वार ठरणार आहे. शेतकर्यांच्यादृष्टीने महत्वपूर्ण रस्त्यावर पूल होणार असल्याने दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.**

# जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सचिवालय कक्षाच्या क्षेत्रीय कार्यालयाची स्थापना

## नागरिकांनी प्रश्न सोडविण्यासाठी कक्षाचा लाभ घ्यावा - जिल्हाधिकारी जयवंशी

**सातारा : प्रतिनिधी**

विभागीय आयुक्त कार्यालय स्तरावर मुख्यमंत्री सचिवालय कक्षाचे क्षेत्रीय कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथे स्थापन करण्यात आले आहे. या कक्षामार्फत सर्वसामान्य जनतेचे दैनंदिन प्रश्न, शासनस्तरावर आलेली कामे व त्यासंदर्भात प्राप्त होणारे अर्ज निवेदने इत्यादींवर कार्यवाही करण्यात येणार आहे, या कक्षाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांनी केले.

मुख्यमंत्री सचिवालय कक्षाचे क्षेत्रीय कार्यालयाची माहिती देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी श्री. जयवंशी बोलत होते. या प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी प्रशांत आवटे उपस्थित होते.

मुख्यमंत्री सचिवालय कक्षाचे क्षेत्रीय कार्यालयाचे नोडल अधिकारी निवासी उपजिल्हाधिकारी असणार आहेत, असे सांगून श्री. जयवंशी म्हणाले, या कक्षाला पुरेसे अधिकारी व कर्मचारीही देण्यात आले आहेत. नागरिकांच्या येणाऱ्या तक्रारींना युनिक कोड देण्यात येणार आहे. ही कार्यवाही संपूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. मंत्रलायस्तरावर अर्जाच्या प्रगतीबाबत लक्ष ठेवण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना कोणत्याही कामासाठी मंत्रालयस्तराव जाण्याची आवश्यकता भासणार नाही आता जिल्ह्यातच त्यांचे प्रश्न सोडविले जातील. जे प्रश्न सोडविण्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यायचा असेल असे प्रश्न मंत्रलाय स्तरावर पाठविण्यात येणार आहेत. तसेच जे प्रश्न सोडविता येणार नाहीत कारणांसह त्यांना लेखी कळविण्यात येणार आहे.

हा उपक्रम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे.सर्वसामान्य जनतेचे दैनंदिन प्रश्न शासनस्तरावर असलेली कामे त्यासंदर्भात प्राप्त होणारे अर्ज व निवेदने याबाबत अधिकाधिक लोकाभिमुखता, पारदर्शकता व गतिमानता आणण्याचा शासनाचा उद्देश असल्याचेही जिल्हाधिकारी श्री. जयवंशी यांनी यावेळी सांगितले.

# आरडगाव येथे विविध विकासकामांचे उद्घाटन

**लोणंद : प्रतिनिधी**

फलटण तालुक्यातील आरडगांव येथे जलस्वराज्य अंतर्गत एक लाख लीटर्सच्या पिण्याच्या पाण्याचे टाकीचे भूमिपूजन व अंगणवाडी कंपाऊंडचे भूमीपूजन संजीवराजे नाईक निंबाळकर (माजी अध्यक्ष सातारा जिल्हा परिषद सातारा ), दिपकराव चव्हाण (आमदार फलटण कोरेगांव विधानसभा मतदार संघ), हिंगणगांव जिल्हा परिषद गटाचे जिल्हा परिषद सदस्य धैर्यशील अनपट यांच्या शुभहस्ते करण्यात आले.



यावेळी बोलताना अनपट म्हणाले, फलटण तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी मा.रामराजे नाईक निंबाळकर, यांच्या सहकार्यामुळे व मार्गदर्शनाने मा.संजीवराजे, आमदार दिपक चव्हाण व आम्ही सर्वजण काम करत आहोत.

ऊसदराचा प्रश्न असो, दुध दराचा प्रश्न असो, बचत गटांचे प्रश्न असो, रस्त्यांचे प्रश्न असो पिण्याच्या पाण्याची प्रश्न असो रोजगाराचे प्रश्न असो अशा सर्व प्रश्नांची सोडवणूक महाराजसाहेब, संजीवबाबांच्या व आमदार साहेबांच्या माध्यमातून होत आहेत.

आमदार चव्हाण म्हणाले, आरडगांवामधील सिमेंट रस्ते, पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न भविष्यात उद्भवू नये म्हणून महाराज साहेबांच्या प्रयत्नामुळे जलस्वराज्य अंतर्गत केंद्र व राज्य सरकारच्या मदतीने तांबवे धरणातून पाईपलाईन करून एक लाख लिटर क्षमतेची भली मोठी टाकी बांधून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटवला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. विजेचे चार डीपी मंजूर झाल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले. बौद्ध वस्तीतील सभा मंडपाचे काम लवकरात लवकर पूर्ण केले जाईल याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. गावातील ग्रामपंचायत ते दत्त मंदिर राहिलेल्या सिमेंटच्या रस्त्याचे काम ही लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्याची ग्वाही त्यांनी दिली.

संजीवराजे बोलताना म्हणाले, आजवर गावाने आमची सोबत सोडली नाही. गावातील सर्व प्रश्नांची सोडवणूक केलेली आहे. उर्वरित अपूर्ण कामेही लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्यास आम्ही कटिबद्ध असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले .सध्या तालुक्यामध्ये कोणते काम केले तरी आम्हीच केले असे सांगितले जात असून युवकांची दिशाभूल केली जात आहे ,अशी दिशाभूल करणाऱ्या लोकांच्या पाठीमागे युवकांनी जाऊ नये असे आवर्जून कोणाचेही नाव न घेता विरोधकांना त्यांनी टोला लगावला. वैयक्तिक कोणाचेही काही काम असेल तर स्वतः आमच्याकडे या, त्यासाठी कोणाला घेऊन येण्याची गरज नाही. तुमचे काम होण्यासारखे असेल तर तत्पर केले जाईल असेही आव्हान संजीवराजे यांनी यावेळी केले.

यावेळी आरडगांवचे सरपंच रवि शिर्के, सामाजिक कार्यकर्ते पराग भोईटे, विक्रांत भोईटे, ग्रामसेवक सोनवलकर, पोलिस पाटील अमित भोईटे, शैलेश भोईटे, वरुण भोईटे,शशिकांत भोईटे, विशुभोईटे, हेमंत भोईटे,विजय भोईटे, सुनिल भोईटे, ऊद्धव भोईटे, महेश धुमाळ, सचिन भोईटे, छगणकाटे, आदी मान्यवर ऊपस्थित होते.

# बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या माध्यमातून महिला सबलीकरण होणार - चंद्रकांत जाधव

**वडूज : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री ना एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली बाळासाहेबांची शिवसेना पक्ष जनतेच्या अडी अडचणी सोडवण्यासाठी कटिबद्ध असून पक्षाच्या वतीने ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी छोटे मोठे उद्योग व्यवसाय उभारून त्यांचं सबलीकरण करण्यासाठी लवकरच ठीक ठिकाणी उद्योग व्यवसाय प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार असल्याचं प्रतिपादन पक्षाचे जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत जाधव यांनी केलं



वडूज ता खटाव येथे बाळासाहेबांची शिवसेना महिला आघाडी च्या नूतन पदाधिकारी निवडी दरम्यान आयोजित बैठकीत जाधव बोलत होते.

यावेळी कोरेगावच्या महिला पदाधिकारी वैशाली झांजूर्णे, प्रिया झांजुर्णे, रूपाली फडतरे, निकिता पवार, विद्या सजगणे, बेबीताई हिरवे, प्रमिला जाधव, कांचन देशमुख आदी महिलांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या १० तारखेच्या वाढदिवसानिमित्त चर्चाही यावेळी करण्यात आली.

जिल्हा उपसंघटीका संगीता पवार यांच्या नेतृत्वाखाली खटाव तालुक्यातील महिला पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. यामध्ये रीतिका अतुल घोणे यांची खटाव तालुका अध्यक्षपदी, उज्वला शिंदे यांची खटाव तालुका संघटिका पदी, सुनंदा महामुनी यांची उपतालुका संघटकपदी, दीपाली शिंदे यांची उपतालुका अध्यक्षपदी, रेखा महापुरे यांची उपतालुका अध्यक्षपदी, लक्ष्मी आरमुने यांची उपतालुका अध्यक्षपदी, अर्चना पवार शहराध्यक्ष, सारिका राऊत उपाध्यक्ष,जयश्री सस्ते विभाग प्रमुख, शोभा कोळेकर उपविभाग प्रमुख, रूपाली काळे विभाग प्रमुख, रेखा लोहार उपविभाग प्रमुख आदी महिला पदाधिकाऱ्यांच्या यावेळी निवडी करण्यात आल्या. जिल्हाध्यक्ष चंद्रकांत जाधव यांच्या हस्ते या महिलांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी तालुक्यातील बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# गोरेगाव निमसोड गावाला विकासकामी सहकार्य - सुरेंद्र गुदगे

**केंद्र समूहाचा बाल आंनद मेळावा उल्लेखनीय**

**वडूज : प्रतिनिधी**

पिण्याच्या पाण्याची कायम टंचाई असलेल्या गोरेगाव निमसोड गावासाठी शासनाच्या जलजीवन मिशन योजनेतून लवकरच २४ तास पाणीपुरवठा योजना मंजूर करून देणार असल्याचे प्रतिपादन मायणी जिल्हा परिषद गटाचे माजी सदस्य युवा नेते सुरेंद्र गुदगे यांनी आयोजित कार्यक्रमात केलं.

धोंडेवाडी केंद्र समूह अंतर्गत जिल्हा परिषदेच्या १६ प्राथमिक शाळांच्या गोरेगाव निमसोड येथील बाल आंनद मेळावा सांस्कृतिक उपक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी गुदगे बोलत होते.

यावेळी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची संपूर्ण गावातून पालखी दिंडी काढण्यात आली. त्यांनतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. यावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष डॉ वैभव माने,खटाव माण ॲग्रो कारखान्याचे संचालक महेश घार्गे, युवा नेते मोहन देशमुख, सरपंच, उपसरपंच, विक्रमराज डोईफोडे, युवा नेते संतोष पाटील, महादेव बनसोडे, केंद्रप्रमुख साळुंखे, मुख्याध्यापक मधुकर कोळी आदींची उपस्थिती होती.



# सातारा अर्कशाळेचे मॅनेजर डॉ. उदय देशपांडे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**सातारा : प्रतिनिधी**

येथील आयुर्वेदिक अर्कशाळेचे मॅनेजर डॉ. उदय देशपांडे हे ध्येयवादी, व्यवस्थापन कुशल व संस्थेच्या प्रगतीमध्ये मोलाचा वाटा असलेले होते. त्यांच्या ध्येयवादी व निस्वार्थी सेवेचा आयुर्वेदिक अर्कशाळेला नक्कीच फायदा झाला असे गौरवोद्गार आयुर्वेदिय अर्कशाळेचे चेअरमन रवींद्र हर्षे यांनी काढले.

साताऱ्याच्या आयुर्वेदिय अर्कशाळेचे मॅनेजर डॉक्टर उदय देशपांडे हे चाळीस वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त झालेबद्दल त्यांचा कंपनीचे चेअरमन डॉ. रवींद्र हर्षे यांच्या हस्ते विविध भेटवस्तू व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला त्यावेळी डॉ. रवींद्र हर्षे बोलत होते.



यावेळी संचालक सर्वश्री शामसुंदर गोखले, डॉ. अच्युत गोडबोले, डॉ धनंजय बोधे, डॉ. दिलीप पटवर्धन, एडवोकेट नितीन वाडीकर, अनिल काटदरे तसेच नूतन मॅनेजर सतीश देशपांडे, नूतन सेक्रेटरी मकरंद एरंडे हे उपस्थित होते.

डॉ. उदय देशपांडे यांच्या संचालक मंडळ, भागधारक, कच्चामाल व्यापारी, विक्रेते व वितरक, सरकारी विभाग, बँकर्स व सर्व सेवक वर्ग यांच्याशी योग्य संवाद व समन्वय साधत कंपनी सतत प्रगतीपथावर नेण्याचा प्रयत्न याबद्दल सर्वच वक्त्यांनी मनोगतामध्ये त्यांचे कौतुक केले. यावेळी मोहन तगारे, विनायक गोखले, पल्लवी कुलकर्णी, पांडुरंग पवार, नूतन व्यवस्थापक सतीश देशपांडे, नूतन सेक्रेटरी मकरंद एरंडे यांनी मनोगते व्यक्त केली व संस्थेचे कार्य पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला.

निरोप समारंभामध्ये सत्काराला उत्तर देताना डॉ. उदय देशपांडे यांनी अर्कशाळेतील आपल्या कारकिर्दीचा आढावा घेत आठवणींना उजाळा दिला व सर्वांचे आभार मानले. तसेच त्यांच्या कारकीर्दीत करावयाच्या काही राहिलेल्या कामांविषयी उल्लेख केला. भविष्यात अर्कशाळेला विक्रीसंबंधी काही नवीन योजनाही सुरू कराव्या लागतील. तसेच काही नवीन उत्पादनेही आणावी लागतील याबद्दल मौलिक मार्गदर्शन केले. संस्थेस भविष्यात कोणतीही मदत लागल्यास नेहमीच सहकार्य करण्याचे त्यांनी आश्वासन दिले. प्रास्ताविक सेल्स मॅनेजर भास्कर काळे यांनी केले आभार योगेश देशपांडे यांनी मानले.

## धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना

**सातारा** : शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी निकष खालीलप्रमाणे आहेत.

विद्यार्थी धनगर समाजातील असावा. विद्यार्थ्याने अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे. विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न अडीच लाखापेक्षा जास्त नसावे. विद्यार्थ्याने स्वत:चा आधार क्रमांक आपले राष्ट्रीयकृत बँक खात्याशी संलग्न करणे बंधनकारक राहील. अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सातारा, दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२९८१०६ या कार्यालयास संपर्क करावा.

# पोलीस असल्याचे सांगून भामट्याने केली दीड तोळ्याची सोन्याची चेन लंपास

**वडूज : प्रतिनिधी**

पोलीस असल्याचे सांगून अज्ञात इसमाने रोख रक्कम व ५५ हजार रूपये किंमतीची दीड तोळे वजनाची सोन्याची चैन लांबविल्याची घटना वडूज - कराड रस्त्यावर शिवाजीनगर येथे घडली. याबाबत चंदू कृष्णा पवार (वय ८१, रा.उंबर्डे, ता.खटाव) यांनी वडूज पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पवार यांनी फिर्यादीत दिलेल्या माहितीनुसार, काल (सोमवारी ता.६) रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास पत्नी सौ. रूक्मिणी या आजारी असल्याने त्यांना येथील एका खासगी रूग्णालयात उपचारासाठी आणले होते. त्यावेळी उपचार करून सौ. पवार या त्यांचे नातेवाईक सुभाष जाधव यांचेबरोबर परत उंबर्डे येथे गेल्या. तर श्री. पवार हे त्यांच्या दुचाकीवरून एकटेच परत उंबर्डेकडे जात होते. त्यावेळी वडूज-कऱ्हाड रस्त्यावर शिवाजीनगर येथे वीज वितरण कंपनीच्या कार्यालयाजवळ निळ्या रंगाचा शर्ट व डोक्याला रूमाल, तोंडाला काळ्या रंगाचा रूमाल बांधलेला अज्ञात इसम त्याच्या दुचाकीवरून आला. मी पोलीस आहे, तुम्हाला आवाज देतोय तुम्ही का थांबत नाही, तुम्ही पोलीसांना किंमत देत नाही पुढे पोलीसांचे चेकींग सुरू आहे असे सांगितले. त्याठिकाणी रस्त्यावर अगोदरच थांबलेल्या अन्य इसमाला बोलावून त्याने त्याच्याकडील साहित्य त्याला दिले. व आपणाकडील रोख रक्कम व गळ्यातील १५ ग्रॅम वजनाची सुमारे ५५ हजार रूपये किंमतीची सोन्याची चैन काढून घेऊन त्याच्याकडील रूमालाची गाठ बांधून माझ्या खिशात ठेवले. त्यानंतर आपण घरी गेल्यानंतर खिशात ठेवलेला रूमाल काढला असता त्यामध्ये केवळ रोख रक्कम होती तर सोन्याची चैन दिसून आली नाही. त्यावरून अज्ञात इसमाने पोलीस असल्याचे सांगून आपली सोन्याची चैन रूमालात बांधण्याचा बहाणा करून फसवणूक करीत काढून घेतली.

दरम्यान, या घटनेची पोलिसांत नोंद झाली असून अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलिस करत आहेत.

# गावची नवी ओळख; वावरहिरे आता नव्याने ओळखू लागले 'डॉक्टरांचे गाव...!'

## वैद्यकीय क्षेत्राकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल; बाराहून अधिक विद्यार्थी घेतात वैद्यकीय शिक्षण

**वावरहिरे : प्रतिनिधी**

समाजात डॉक्टरी पेशाकडे सन्मानानं, आदरानं पाहिलं जातं. गेल्या दोन-अडीच वर्षांत देशभरात कोरोनामुळे निर्माण झालेली स्थिती आणि अशा स्थितीतही डॉक्टरांनी बजावलेलं कर्तव्य आणि केलेली सेवा कोणीही विसरू शकणार नाही. ज्याप्रमाणे एखादं गाव किंवा कुटुंब सैनिकांसाठी म्हणून ओळखलं जातं, त्याचप्रमाणे सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील वावरहिरे गाव आता 'डॉक्टरांच गाव' म्हणून नव्याने उदयास येवू लागले आहे.

मागील दशकापासून शिक्षण क्षेत्रात या गावाने आमूलाग्र बदल घडवला. बारावी झाल्यानंतर शिक्षक होण्यासाठी येथील विद्यार्थ्यांचा डी. एड ,बी.एड करण्याकडे प्रामुख्याने जास्त कल दिसायचा. राज्याला व सातारा जिल्ह्यास या गावाने अनेक शिक्षक दिलेत. या शिक्षकी पेशाबरोबरच गावातील अनेक विद्यार्थी आता नव्याने वैद्यकीय क्षेत्रातही चमकू लागले आहेत. चालू वर्षात या गावात एकुण बारा विद्यार्थ्यांनी वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेत संपुर्ण राज्यात गावची एक वेगळीच ओळख निर्माण केली आहे.आतापर्यंत येथील वैद्यकिय शिक्षण घेवून समाजसेवा करत असलेले जवळपास तीस हुन अधिक भूमिपुत्र डॉक्टर असून राज्यात विविध शहरात ते वैद्यकीय सेवा देत आहेत. बालरोगापासून ते हृदयरोग तज्ञ पर्यंत सर्व वैद्यकीय विभागात कार्यरत आहेत. एकुणच वैद्यकीय क्षेत्रात गाव देत असलेलं योगदान पाहता हे गाव आता 'डॉक्टरांच गाव' म्हणून नवी ओळख निर्माण करू लागले आहे.



### मी हे करू शकतो!

गावात पुर्वी वैद्यकीय शिक्षण घेणारे मोजकेच विद्यार्थी प्रयत्न करत होते .परंतु ही संख्या आता दिवसेंदिवस वाढत आहे. वैद्यकीय शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचा ओढा वाढलेला आहे. ''मी हे करू शकतो '' या प्रेरणेने प्रेरित होऊन अनेक विद्यार्थी प्रचंड मेहनत घेऊन वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त होत आहेत. विद्यार्थ्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी गावातील पालक ही आता पुढे सरसावत आहेत.

एकाच कुटुंबातील आठ जण वैद्यकिय क्षेत्रात अकोला अप्पर पोलिस अधिक्षक असलेल्या वावरहिरे गावाच्या सौ. मोनिका नंदकुमार राऊत यांच्या कुटुंबातील एकुण सहा जणांनी वैद्यकिय शिक्षण पुर्ण केले. तर सध्या दोन जणांचे शिक्षण सुरु आहे. तसेच जि.प. शाळा.मुख्यध्यापक असलेले हणमंतराव अवघडे यांची दोन्ही मुले व मुलगी वैद्यकीय शिक्षण घेत आहेत.गावातील या दोन्हीं ही कुटुंबाचा वैद्यकीय क्षेत्राकडे असलेला कल प्रामुख्याने गावच्या लौकिकेत भर टाकणारा आहे.

**वैद्यकीय शिक्षण घेत असलेले विद्यार्थी**

डॉ. आदित्य अरविंद पांढरे-( एम. बी बी. एस), डॉ. मृणालिनी नंदकुमार राऊत- (एम. बी. बी. एस), डॉ. अनुष्का हनुमंत शिंदे- (एम .बी. बी.एस), डॉ. हरीष हणमंतराव अवघडे -(बी.ए.एम एस), डॉ. सुनील भीमराव भुजबळ -(बी. ए.एम.एस), डॉ.ऋतुजा दत्तात्रय पांढरे- (एम .बी. बी. एस), डॉ.स्वप्नाली मारुती घनवट- (एम .बी. बी.एस), डॉ. वृषाली तानाजी राऊत -(एम .बी.बी.एस), डॉ.श्रुती हणमंतराव अवघडे- (बी. ए.एम.एस), डॉ.विवेक हणमंतराव अवघडे -(एम.बी.बी.एस), डॉ. शुभांगी किसन ढोपे- (बी.ए.एम. एस), डॉ.संकेत तुळशीराम यादव -(बी. एच.एम.एस).

# लोकशाही दिनात एक अर्ज प्राप्त




**सातारा : प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिन निवासी उपजिल्हाधिकारी प्रशांत आवटे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये आज एक तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील परिषद सभागृहात आयोजित केलेल्या लोकशाही दिनास विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# 'गावसकर बॉर्डर चषक' भारत जिंकेल

## माजी कर्णधार कपिल देव यांना विश्वास

**मुंबई : प्रतिनिधी**

कसोटी क्रिकेटमध्ये संतुलित असलेला आणि जोमात असलेला भारतीय संघच गावसकर बॉर्डर कसोटी क्रिकेट चषकाचा मानकरी ठरेल, असा विश्वास महान अष्टपैलू क्रिकेटपटू आणि माजी कर्णधार कपिल देव यांनी क्रिकेट विषयक संकेतस्थळाला दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केला.



भारत आणि ऑस्ट्रेलिया संघामध्ये ३ कसोटी सामन्यांची गावसकर बॉर्डर चषक मालिका खेळवली जाणार असून पहिला सामना नागपूर येथे होत आहे.

या मालिकेत भारताचा कसोटी संघ कसा असावा, याबाबत आपली मतेही कपिल देव यांनी व्यक्त केली आहेत.

शुभमन गिल हा गुणी फलंदाज असून त्याला संघात स्थान मिळाले तर रोहित शर्माबरोबर फलंदाजीची सुरुवात करण्यासाठी त्याला पाठवावे, असा सल्ला कपिल देव यांनी दिला आहे.

के एल राहुल तंदुरुस्त नसेल तर त्याला संघात ठेवण्याचा अट्टाहास नको, असे सांगतानाच कपिल यांनी दुखापतग्रस्त खेळाडूंबाबत मोलाचा सल्ला दिला आहे. दुखापतग्रस्त खेळाडू दुखापतीतून बाहेर पडल्यावर त्यांना थेट आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळविण्यात येऊ नये. आपली लय आणि सूर गवसेपर्यंत त्यांना स्थानिक सामन्यात खेळवावे, असे ते म्हणाले.

संघात ४ फिरकी गोलंदाज खेळविण्याचा पर्याय अव्यवहार्य असल्याचे त्यांनी सांगितले. खेळपट्टी खास फिरकीला साथ देणारी असेल तर ३ , अन्यथा २ फिरकी गोलंदाज खेळविणे योग्य ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. भारतीय संघात मोहोंमद सिराज आणि मोहोंमद शमी यांचा समावेश असावा. तसेच फिरकी गोलंदाजांमध्ये रवींद्र जडेजा आणि अक्षर पटेल यांना स्थान द्यावे, असेही ते म्हणाले.

# जम्मू-काश्मीरमध्ये नेत्यांच्या अतिक्रमणांवर बुलडोझर

- १.७५ लाख एकर जमीन मोकळी
- नॅशनल कॉन्फरन्स, पीडीपी नेत्यांसह प्रभावशाली व्यक्तींची होती अवैध बांधकामे



**श्रीनगर : वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरमध्ये ९ जानेवारीपासून अतिक्रमणाविरोधी मोहीम सुरू आहे. आजवर १४ लाख कनाल म्हणजेच १.७५ लाख एकर सरकारी जमिनीवरील नेते व प्रभावशाली व्यक्तींची अवैध बांधकामे बुलडोझरने पाडून जागा मोकळी करण्यात आली. राज्यात २.७५ लाख एकर जमीन आहे. महसूल सचिव विजयकुमार बिधुरी म्हणाले, ७ लाख कनालवरील अतिक्रमण काढण्याचे व जमिनीवर कुंपण घालण्याचे काम सुरू आहे.

मोहिमेत नॅशनल कॉन्फरन्सच्या नेत्यांना सर्वाधिक फटका बसला. गुरुवारी निदाज हॉटेलची ४० कनाल जागा मोकळी केली. त्यावरील मालमत्ता माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांच्या निकटवर्तीयांची होती. पक्षाचे सरचिटणीस अली मोहम्मद सागर यांच्या पत्नीच्या मालकीची इमारतही पाडली.

जम्मू-काश्मीर काँग्रेसचे माजी अध्यक्ष पीरजादा मोहम्मद सईद, माजी पीडीपी मंत्री सय्यद फारूक अंद्राबी यांचे कुटुंब आणि माजी मुख्यमंत्री सय्यद मीर कासिम यांच्या नातेवाइकांच्याही ताब्यातील जमिनीही सोडविण्यात आल्या आहेत.

**भाजपच्या उपमुख्यमंत्र्यांचीही २३ कनाल जमीन ताब्यात**

भाजप नेते व माजी उपमुख्यमंत्री कविंदर गुप्ता यांच्या ताब्यातील २३ कनाल जमीन प्रशासनाने परत घेतली आहे. गेल्या आठवड्यात, श्रीनगर प्रशासनाने एका दिवसात ५०९ कोटींची ४९४ कनलांहून जास्त मोक्याची जागा मोकळी केली.

# आप्पासाहेब धर्माधिकारींना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार जाहीर

## मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी निवासस्थानी जाऊन घेतली भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्येष्ठ निरुपणकार, पद्मश्री डॉक्टर आप्पासाहेब धर्माधिकारी यांना राज्य सरकारचा सर्वोच्च महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



राज्य सरकारकडून 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. अध्यात्म, समाज प्रबोधन, सामाजिक कार्य, अंधश्रद्धा निर्मूलन यासाठी केलेल्या कार्याची दखल घेत राज्य सरकारनं पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार जाहीर केला आहे.

ज्येष्ठ निरुपणकार आणि पद्मश्री किताबाने सन्मानित डॉक्टर श्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांना राज्य सरकारचा सर्वोच्च महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. आज (बुधवारी) मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी त्यांच्या रेवदंडा इथल्या त्यांच्या निवास्स्थानी जाऊन त्यांची भेट घेतली.

दासबोध आणि श्री सद्गुरू चरित्रच्या माध्यमातून समाज घडवण्याचं कार्य आप्पासाहेब धर्माधिकारी करत आहेत. त्यांचे वडील नानासाहेब धर्माधिकारी यांच्याकडून त्यांनी हा वारसा घेतला. श्रवण बैठकांच्या माध्यमातून अध्यात्म आणि समाज परिवर्तनाचं कार्य त्यांच्याकडून गेली आठ दशकं सुरू आहे.

नानासाहेब धर्माधिकारी यांनी रुजवलेल्या रोपट्याचं वटवृक्ष करण्याचं कार्य आप्पासाहेबांनी केलं आहे. त्यांचं हेच कार्य त्यांचे चिरंजीव सचिनदादा धर्माधिकारी करत आहेत.

दासबोधावरील श्रवण बैठका महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात होत आहेतच, शिवाय देशातील सर्व राज्ये आणि जगातील बहुतांश देशात हे कार्य सुरू आहे. अध्यात्म क्षेत्रात कार्यरत असतानाच सामाजिक कार्यात त्यांचा मोठा वाटा आहे.

टी. व्ही. अथवा मोबाईलशी खिळून राहणाऱ्या पिढीपेक्षा

# मैदानात मातीत लोळून, पडून खेळणाऱ्या युवा पिढीची समाजाला गरज

**आ. रामराजे नाईक निंबाळकर**

**फलटण : प्रतिनिधी**

टी. व्ही. अथवा मोबाईलशी खिळून राहणाऱ्या पिढीपेक्षा मैदानात मातीत लोळून, पडून खेळणाऱ्या युवा पिढीची भविष्यात समाजाला गरज असून पालकांनी आपल्या पाल्यांना लहानपणीच खेळाची आवड ओळखून प्रशिक्षण व पाठबळ देण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट प्रतिपादन आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी साखरवाडी येथे बोलताना केले.

इलेव्हन स्टार फुटबॉल क्लब आयोजित राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर बोलत होते, यावेळी श्रीदत्त इंडिया कंपनीचे प्रशासकीय अधिकारी अजितराव जगताप, महानंदचे संचालक डी. के. पवार, पं. स. माजी सभापती शंकरराव माडकर, श्रीराम सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन नितीन शाहुराज भोसले, राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष सागर कांबळे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष सतीश माने, संजय भोसले, फलटण तालुका साखर कामगार युनियनचे सेक्रेटरी राजेंद्र भोसले, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय वाघ, हरीश गायकवाड, मच्छिंद्र भोसले, तंटामुक्ती समिती उपाध्यक्ष दिलीप पवार, शरदराव जाधव, संयोजक डॉ. विक्रम खानविलकर, शरद भोसले, सुनील वाघ, एस. के. भोसले यांच्यासह परिसरातील क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

साखरवाडी गावाला खेळाची फार जुनी परंपरा असून भविष्यात येथे क्रीडा संकुल उभारण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही देत तरुणांनी आपल्या आवडीच्या खेळासाठी वेळ देवून नियमीत सरावाद्वारे



त्यामध्ये गुणवत्ता प्राप्त करावी असे आवाहन आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी यावेळी केले.

इलेव्हन स्टार फुटबॉल क्लब आयोजित राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी ते बोलत होते, या स्पर्धेच्या प्रथम क्रमांकाचे पारितोषिक सातारा संघाने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पुणे व तृतीय व चतुर्थ क्रमांकाचे पारितोषिक कराड व लोणंद या संघांना विभागून देण्यात आले. रोख रक्कम फिरता चषक व सन्मानचिन्ह असे पारितोषिकाचे स्वरुप आहे.

आ. रामराजे म्हणाले, सर्व आंतरराष्ट्रीय खेळांचा उगम ग्रामीण भागातुन झाला असून शहरांमधील खेळाडूंना मिळणाऱ्या संधी व प्रशिक्षण ग्रामीण भागाच्या तुलनेत निश्चित जास्त मिळत असले तरी ग्रामीण भागातील खेळाडू कष्ट व जिद्दीच्या जोरावर आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकले आहेत, व भविष्यातही साखरवाडी येथे अशा स्पर्धांचे आयोजन करावे त्यासाठी श्री दत्त इंडिया कारखाना व माझ्याकडून निश्चितच मदत केली जाईल.

# सातारा जिल्ह्यासाठी कामगार भवन व सुरक्षारक्षक मंडळ कार्यालय मंजूर

## डॉ. दिलीप येळगावकर यांचा कामगार मंत्री सुरेश खाडे यांच्याकडे यशस्वी पाठपुरावा

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यासाठी स्वतंत्र कामगार भवन आणि सुरक्षा रक्षक मंडळ कार्यालय मंजूर करण्यात आले आहे.याचे आदेश कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी नुकतेच दिले,यासाठी सातारा औद्योगिक वसाहतीतील व सदर बाजार येथील एकूण चार जागा सुचवण्यात आल्या आहेत या सर्व प्रस्तावांचा पाठपुरावा कैलासवासी नामदेवराव घाडगे सुरक्षारक्षक व जनरल कामगार युनियन यांच्या माध्यमातून करण्यात आला आहे अशी माहिती माजी आमदार डॉक्टर दिलीप येळगावकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.



यावेळी कामगार युनियनचे अध्यक्ष अभिजीत येळगावकर आणि सचिव रमेश जाधव इत्यादी उपस्थित होते डॉक्टर येळगावकर पुढे म्हणाले सातारा जिल्ह्यामध्ये साखर कारखान्यांमध्ये ओझी उचलणाऱ्या कामगारांना माथाडीचा दर्जा मिळत नाही या कामगारांना माथाडी कामगार कायदा लागू करण्यात आला होता मात्र या कायद्याची स्पष्ट अंमलबजावणी न करण्यातच यंत्रणेने धन्यता मानली आहे .सातारा जिल्ह्यामध्ये २९५ सुरक्षारक्षक असून २०१९ पासून त्यांचा पगारच झालेला नाही . सातारा सांगली कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यातील सुरक्षारक्षकांचे एकच सांगली येथे कार्यालय आहे सातारा जिल्ह्यामध्ये २९४ सुरक्षा रक्षक असून सांगली जिल्ह्यामध्ये ८३ आहेत या कामगारांच्या पगारासाठीचे चार कोटी २१ लाख ९३ हजार रुपये अद्याप देणे प्रलंबित आहेत मात्र या विषयावर आवाज कोणी उठवायचा हा खरा प्रश्न होता म्हणून आम्ही कैलासवासी नामदेवराव घाडगे सुरक्षा रक्षक व जनरल कामगार युनियनची स्थापना केली असून त्या माध्यमातून या प्रश्नाचा पाठपुरावा सुरू आहे.

नुकत्याच कामगार मंत्री सुरेश खाडे यांच्या दालनात झालेल्या बैठकीत या विषयांवर यशस्वी तोडगा काढण्यात आला सातारा जिल्ह्यासाठी स्वतंत्र सुरक्षा रक्षक मंडळ कार्यालय व स्वतंत्र कामगार भवन आणि त्याच परिसरामध्ये ईएसआय हॉस्पिटल उभारण्याच्या संदर्भातील महत्त्वपूर्ण आदेश सुरेश खाडे यांनी दिले आहेत याकरता काही जागा प्रस्तावित करण्यात आल्या असून यामध्ये सातारा एमआयडीसी येथील सरकारी दूध संघाची १७ एकर जागा सुचवण्यात आली आहे तसेच येथील वीज उपकेंद्राच्या लगतची १५ एकर जागा सुद्धा सुचवली गेली आहे या कार्यालयांच्या संदर्भातील कामांचे प्रस्ताव अंतिम होऊन लवकरच या कामांना सुरुवात केली जाणार आहे.

सुरक्षारक्षकांच्या नेमणुका यापुढे सहाय्यक कामगार आयुक्त यांच्या माध्यमातूनच केल्या जातील खाजगी सुरक्षारक्षकांची मक्तेदारी आणि त्या माध्यमातून मध्यस्तांची बोकाळलेली दलाली याला प्रतिबंध होणार आहे यापुढे मध्यस्थामार्फत सुरक्षा रक्षकांचे पगार न होता ते थेट सुरक्षा मंडळ आणि कामगार आयुक्त कार्यालय यांच्या माध्यमातून सुरक्षारक्षकांच्या खात्यावर जमा होणार आहे . कामगार भावनासाठी एमआयडीसीच्या कर रूपाच्या माध्यमातून शासनाला सात कोटी रुपयांचा महसूल मिळतो त्यामुळे स्वतंत्र कामगार भवनासाठी लवकरच जागा अंतिम होऊन याचे काम सुरु होणार असल्याचे डॉक्टर येळगावकर यांनी स्पष्ट केले.

कामगार भवन कार्यालय परिसरातच ईएसआय हॉस्पिटल उभे केले जाणार आहे कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न हा सातत्याने ऐरणीवर येत असतो त्यांना योग्य दरात दर्जेदार औषधोपचार मिळावेत हा यामागचा हेतू आहे या प्रश्नांची तड लावण्यामध्ये आम्ही यशस्वी ठरलो आहोत गेल्या सात वर्षांपासून या प्रश्नांचा पाठपुरावा सुरू होता त्यामुळे कामगार मंत्री सुरेश खाडे यांचे मी मनापासून धन्यवाद देतो असे माजी आमदार डॉक्टर दिलीप येळगावकर म्हणाले.

# त्वचारोग संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. सुरेश महाजन व सचिवपदी डॉ. सुधीर बक्षी यांची बिनविरोध निवड

**सातारा : प्रतिनिधी**

इंडियन असोसिएशन ऑफ डरम्याटॉलॉजिस्ट, व्हेनेरिओलॉजिस्ट व लेपरॉलॉजिस्ट या अखिल भारतीय संघटनेच्या सातारा-कराड-सांगली या चाप्टरची निवडणूक नुकतीच पार पडली. त्यामध्ये साताऱ्याचे डॉ. सुरेश महाजन यांची अध्यक्षपदी तर डॉ. सुधीर बक्षी यांची सचिव पदी निवड झाली. तसेच डॉ. सुनील पटवर्धन व डॉ. वैशाली सप्रे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. डॉ. किरण जगताप यांची खजिनदार पदी फेरनिवड व डॉ. आदित्य महाजन व डॉ. रोहन पाटील यांची जॉईंट सेक्रेटरी या पदी निवड झाली. सर्व पदांची निवडणूक ही एकमताने व बिनविरोध झाली.

डॉ. सुरेश महाजन यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना त्वचारोगासंबंधी एकमेकांकडून शिकणे व शिकविणे व त्याचा उपयोग समाजातील गरजू रुग्णांसाठी फायदा करणे हा या संघटनेचा उद्देश आहे असे नमूद केले. त्वचा रोगाविषयी समाजामध्ये अनेक गैरसमज आहेत. विशेषतः कुष्ठरोग, कोड, एड्स, सोरीयासिस, नागिण वगैरे रोगाविषयी समाजामध्ये जनजागृती निर्माण करणे व त्यावर शास्त्रशुद्ध उपचार करणे; हेही या संघटनेचे उद्दिष्ट आहे. यासाठी जगभर जागतिक कुष्ठरोग दिवस, जागतिक एड्स दिवस, जागतिक व्हिटीलिगो दिवस पाळले जातात. संघटनेचे सर्व सभासद वर्षातून तीन ते चार वेळा एकत्र येऊन कंटिन्यूड मेडिकल एज्युकेशनच्या द्वारे आधुनिक शोध, आधुनिक उपचार पध्दती व संशोधन याचे आदान-प्रदान करण्यात येईल व त्यासाठी सर्वच सभासद भाग घेतील अशी अपेक्षा व्यक्त केली.





मावळते अध्यक्ष सांगलीचे डॉ. भरत शाह यांनीही त्यांचे मनोगत व्यक्त केले. साताऱ्याचे ज्येष्ठ त्वचारोगतज्ञ डॉ. मोहन पाटील यांनी कार्यक्रमाचे मार्गदर्शन केले व पुढेही ते संघटनेला मार्गदर्शन करणार असल्याचे त्यांनी नमूद केले. माजी सचिव डॉ. टिप्पणवार यांनी मागील वर्षाचा अहवाल सादर केला. कार्यक्रमांमध्ये पुण्याच्या डॉ. अजय देशपांडे आणि डॉ. धनराज चव्हाण यांनी स्लाईड शो द्वारे त्वचारोगावरील आधुनिक उपचारासंबंधी निबंध सादर केले. तसेच खजिनदार डॉ. किरण जगताप यांनी मागील तीन वर्षाचा आर्थिक अहवाल सादर केला व तो एक मताने मंजूर झाला.

कार्यक्रमानंतर संस्थेचे एक सामाजिक कार्य म्हणून व डॉ. मोहन पाटील यांच्या प्रेरणेने अंधारी, तालुका जावळी, जि. सातारा येथील श्री कासाईदेवी केंद्रीय निवासी आश्रम शाळा येथे विद्यार्थ्यांना गणवेश व खाऊचे वाटप त्वचारोग संघटनेतर्फे करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी सांगलीहून डॉ. भरत शाह, डॉ. अमित शहा, डॉ. टिप्पणवार, डॉ. पुरंदरे, डॉ. भोई, डॉ. भोसले; कराडहून डॉ बाळकृष्ण निकम, डॉ. जमाले, डॉ. मोहन काळे, डॉ. धनंजय चव्हाण, डॉ. सावंत वगैरे त्वचारोग तज्ञ, तसेच बहुसंख्य पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. अजित सुरले पाटील, डॉ. अण्णा कदम, डॉ. सुषमा घारगे, डॉ. आदित्य महाजन, डॉ. रोहन पाटील यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शाहरुख बागवान यांनी केले. सचिव डॉ. सुधीर बक्षी यांनी सर्वांचे आभार मानले.

# मेढा नगरपंचायतीची कर आकारणी रद्द करण्याचा शब्द आमदारांनी पाळला नाही : अमित कदम

**मेढा : प्रतिनीधी**

जावली तालुक्याच मुख्य ठिकाण म्हणुन ओळख असलेल्या मेढा नगरपंचायतीच्या पहील्या चतुर्थ कर आकारणी अन्यायकारक जिजीया कर रद्द करण्याचा शब्द अद्याप आमदार शिंवेद्रराजेनी पाळला नाही. मात्र सातारची चतुर्थ कर आकारणी रद्द करण्याकरीता नगरविकास विभागाकडे सहा महीने पाठपुरावा करुन कर आकारणीत पत्र मिळवणार्या आमदारांचा मेढ्यातील रहिवाश्यांवर अन्याय का? असा संवेदनशील प्रश्न मेढ्याचे भूमीपुत्र अमित कदम यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे विचारला आहे.

सातारा जावली विधानसभेचे नेत्रुत्व करत असताना आमदार शिंवेद्रराजे भोसले नेहमी पाठपुराव्याचे यश मिळाल्याचे श्रेय घेत असतात. मात्र मेढा नगरपंचायतच्या जुलमी व अन्यायकारक चतुर्थ कर आकारणी विरोधात ग्रामस्थांनी आंदोलन केले तेव्हा ग्रामास्थांना कर आकारणी तुर्तास थांबवली असल्याचे तोंडी सांगितले मात्र अद्याप नगरविकास विभागाकडून कोणतीच स्थगितीची कारवाई झाली नाही. याला जबाबदार कोण? असा सवाल देखील अमित कदम यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे विचारला आहे. मेढा नगरीच्या प्रारुप विकास आराखड्याला देखील स्थगिती देण्याचा जाहीर मिटींगमध्ये आपण मेढावाशियांना शब्द दिला होता मात्र तो ही अद्यापही पाळला गेला नाही.

आपण सातारा जावली विधानसभेचे नेत्रुत्व करता मग जो न्याय सातारला तो न्याय मेढ्याला आपण का देत नाही. आपल्या विचाराचे बहुमत मेढा नगरपंचायत मध्ये असताना आपण चतुर्थ कर आकारणी का रद्द करु शकला नाही. मेढ्याच्या जनतेच्या माथी जिजीया कर कोणी लादला? या सर्व प्रश्नाची उत्तरे आता लोकांना मिळाली आहेत. लोकप्रतिनीधी म्हणुन फक्त शेलक्या कांमाच श्रेय घ्यायच अन् जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नात मात्र हात वर करायचा हा आपला मानदंड राहीला आहे. मतदार संघातील सगळ्या नागरीकांना समान न्याय देण्याच्या भुमीकेला आपण छेद दिला आहे. आपण मेढ्याच्या चतुर्थ कर आकारणी रद्द करण्यासाठी कोणताही ठाम प्रयत्न केला नसल्यामुळे जुलमी जिजीयाकर मेढेकरांच्या माथी मारला असल्याचे जळजळीत सत्य समोर आले आहे हे मात्र निश्चित. सातारा नगर परिषदेला न्याय देत असताना आपल्याच मतदार संघातील जावली तालुक्यातील मेढा नगरपंचायतीला सापत्न वागणूक का? असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, करवाढीच्या संदर्भात मेढा ग्रामस्थांच्या वतीने मेढा विकास आघाडी , मेढा शेतकरी बचाव संघ यांनी दि. २७/७/२०२२ तसेच दि..७/११/२०२२ रोजी मुख्याधिकाऱ्यांना व संबधीत सर्वच प्रशासकिय अधिकाऱ्यांना निवेदने दिली आहेत. मात्र त्याबाबत अद्याप कार्यवाही झाली नाही. चतुर्थ करवाढ व अन्याय कारक विकास आराखडया बाबत आपण मेढा नागरीक व शेतकरी बचाव संघाबरोबर असून नागरीकांना न्याय न मिळाल्यास आपण नागरीकांबरोबर रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशारा अमित कदम यांनी दिली आहे.